रे.मु.नं.३९/२०१७
त्र्यंबक वि. सिताराम

**आदेश नि.क्र.१६**

सदर अर्ज कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करून कैफियत स्वीकारण्यासाठी आहे.

२. अर्ज, म्हणणे, दावा व कागदपत्रांचे अवलोकन केले.

३. दोन्हीं बाजुंचा युक्तिवाद ऐकला.

४. अर्जदाराचे थोडक्यात कथन असे की, त्यांना सुट्टी न मिळाल्याने ते वेळेत जबाब व कैफियत दाखल करू शकले नाहीत. दरम्यान आपसात समजुतीची बोलणी चालु होती त्यामुळे विलंब झालेला आहे.

५. समोरील बाजूचे थोडकयात म्हणणे असे की, अर्ज बेकायदेशीर आहे, कारणे खोटी आहेत, शेवटी अर्ज नामंजूर करण्यास विनंती केली.

६. अद्याप विनाकैफियत आदेश झालेला नाही. त्यानंतर दाव्यात प्रगती नाही. दाव्याचे स्वरूप पाहता संधी मिळणे आवश्यक आहे, करिता खालील आदेश.

**आदेश**

अर्ज समोरील बाजूस रू.२००/— (रूपये दोनशे मात्र)खर्च देण्यावर मंजूर करण्यात येतो.

सही/—

दि. २९/०७/२०१९

(श.गि.दुबाले)
दि.न्या.क.स्तर, नांदगाव.